MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

Special Issue February 2019
Peer Reviewed International Refereed Research Journal

# VIDYAWARTA®

Special Issue – Vol. I



## VIMUKTA - NOMADIC CASTES – TRIBES & OTHER BACKSWORD CLASS: PRESENT CONDITIONS, DEVELOPMENT & CHALLENGES.

Guest Editor
Dr.R.D.Rathod
Dr.B.K.Shep
Dr.K.M.Bhange

Scanned by CamScanner

Scanned with OKEN Scanner

५. मार्जिन मनी कर्ज योजना.

६. शिल्प संपदा कर्ज योजना.

७. कृषी संपदा योजना

वरील योजनांशिवाय अनेक योजना आहेत.

**सारांश :**

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त–जाती–जमाती व मागासवर्गीयांसाठी वसंतराव नाईक यांच्या कार्याचे किती महत्त्व आहे हे यावरील योजनावरून सहज दिसून येते. अर्थात वसंतराव नाईक यांनी स्वतःला दारिद्रात राहणाऱ्या लोकांचा नाईक म्हणून तयार केले. त्यांनी भटक्यांना विविध योजनांच्या माध्यमातून अनुदान देवून व आर्थिक सवलता देवून स्थिर करण्याचे कार्य केले. भटक्या जाती–जमातींच्या मुलांना शिक्षण, प्रशिक्षण, उद्योग, पशुपालनासाठी अनुदान, रोजगार प्राप्तीच्या योजना तयार करून देवून त्यांच्या विकासात एक महत्त्वाचे योगदान दिले गेले. त्यांच्या कार्याला महाराष्ट्रातून व भटक्या विमुक्तांच्या जीवनातून जर वगळल्जे तर बाकी शुन्य दिसेल. खऱ्या अर्थाने वसंतराव नाईक यांचे मंत्री व मुख्यमंत्री होणे म्हणजे वरील जाती–जमातीची परवणीच ठरल्यासारखे आहे.

**संदर्भ सूची :**


१. राष्ट्रीय मागासवर्ग वित्तिय व विकास महामंडळ,

२. भारत सरकार कल्याण मंत्रालय – दिल्ली,

३. वसंतराव नाईक विकास महामंडळ – मुंबई,

४. पंचायत योजना – महाराष्ट्र शासन, मुंबई.

५. लोकराज्य – महाराष्ट्र शासन, डिसेंबर.२०१२.

६. www.wikipedia

७. mr.vikaspedia.in

८. vanamati.gov.in

९. shodhganga.inflibnet.ac.in


❑❑❑

16

# महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची सध्यस्थिती

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड
समाजशास्त्र विभागप्रमुख,
शि. म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय कळंब

***********

**प्रस्तावना :–**

महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची सध्यस्थिती जर समकालीन परिस्थितीत अभ्यासले तर या समाजातील जाती–जमातीत तसेच उपजातीत परिवर्तन होत असलेला दिसून येईल. परंतु या समाजाच्या अनेक समस्या आहे तशाच दिसून येतात. या सर्व जाती समुदायाची प्रश्नांची चर्चा महाराष्ट्रात सतत चालू असलेले दिसून येते. वेगवेगळया माध्यमांतून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सभा, संमेलने, मोर्चे आणि शोधयात्रा यातून भटक्या विमुक्ताचं दुखणं प्रस्थापित समाजापर्यंत आणि शासनकर्ता पर्यंत पोहचविण्याचे काम या समाजातील कार्यकर्ते करीत आहेत. परंतु अजूनही हवं तसं यश त्यांना मिळालेलं नाही. आज समकालीन युगात या समाजाची परिवर्तनाची तयारी असतांना शासन आणि राज्यकर्ते या समाजाकडे दुर्लक्ष करीत असलेला दिसून येतो. कारण की, या समाजात पाहिजे त्या प्रमाणात विकासात्मक स्थित्यंतरे झालेली दिसून येत नाहीत. म्हणून महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची विकासात्मक आव्हाने स्विकारुन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

संपुर्ण भारत देशात भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीय वास्तव्य करीत असलेला दिसून येतो. महाराष्ट्रात ज्या जाती–जमाती आहेत, तशाच अन्य राज्यात देखील दिसून येतात. त्याच्या सर्व सांस्कृतिक, सामाजिक लोकजीवन पध्दतीचा अभ्यास केल्यास त्याच्या मध्ये सर्वच बाबतीत सारखेपणा दिसून येतं. तरी देखील त्यांच्यात आरक्षण, शिक्षण, सामाजिक दर्जा तसेच अन्य बाबतीत वेगवेगळया राज्यात विषमता दिसून येते. जोपर्यंत जाती–जमातीला महाराष्ट्रात आणि देशात सर्वच प्रकारच्या संधी मिळणार नाही, तोपर्यंत हा संपूर्ण भटका समाज विकसित होणार नाही. म्हणून तसे प्रयत्न शासन व सरकारच्या माध्यमातून होणे गरजेचे आहे.

२१ व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रभाव



Scanned with OKEN Scanner

तसेच नागरिकीकरणाचा स्विकार करुन देखील भटके–विमुक्त आजही भटकंती करीत असलेला दिसून येत आहे. सध्यस्थितीत सर्व जाती–जमातीत आर्थिक विवंचनेतून समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे आज महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, वाडी, वस्ती व तांड्यातून ५० ते ६० टक्के लोक ऊसतोड कामगार, तसेच कामासाठी वेगवेगळया ठिकाणी कामगार म्हणून स्थलांतरीत झाले. तसेच काही लोक उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने हे जनसमूह भीक मागू लागले. भारतीय भिकारी हे भारतीय जातिव्यवस्थेनेच निर्माण केलेले अपत्य आहे. थोडक्यात सांगायचे झाल्यास भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची सध्यस्थिती भारत स्वतंत्र होऊन ७१ वर्शं पुर्ण झाली, तरी देखील आजही महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची संपूर्णत: प्रगती झालेली दिसून येत नाही. कारण या देशात आणि वेगवेगळ्या राज्यात प्रभुत्वशाली जाती समूदायाकडे सत्तेची केंद्र असून सत्तेचा वापर आपल्याच समुदायाच्या विकासासाठी करित असलेला दिसून येतो. सामान्य जाती–जमातीचे शोषण याच वर्गातील सरकार आणि शासनाच्या दरबारात काम करणाऱ्या लोकांकडून होत असलेले दिसून येते. सत्ताधिश आणि उच्चभ्रू समाजातील लोकांचे दृष्टिकोन बदलणे व परिघाच्या बाहेर असलेल्या या भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे फार गरजेचे आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :–**

महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची लोकजीवन पध्दती समजून घेणे.

महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व त्यांची सध्यस्थिती जाणून घेणे.

महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय व त्यांची सध्यस्थिती जाणून घेणे.

**संशोधन पध्दती :–**

शोधनिबंध हा संशोधनाचा एक भाग असतो. ज्या प्रमाणे संशोधनातून संशोधक हा एखाद्या समस्येचे सुत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत पोहचतो. त्याचप्रमाणे शोधनिबंधात देखील एखादी समस्या निश्चित करून त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. त्याच प्रमाणे प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आला असून माहितीचे स्रोत म्हणून संदर्भ ग्रंथ, मासिके आणि वृत्तपत्रांचा वापर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व त्यांची सध्यस्थिती :–**

भटके याचा अर्थ– पाळलेल्या जनावरांसाठी गवताळ प्रदेश शोधित भटकणारे मानवी समूह म्हणजे भटके होय.

Concise English Dictionary मध्ये भटके या शब्दाचा अर्थ असा दिलेला आहे, 'One of a tribe that wanders about seeking pasture for their flocks'.

बाळकृष्ण रेणके यांच्या मते, 'The term nomad is with reference to animal breeding Nomads are animal breeders, and move with their animals in search of pasture'.

मोतीराज राठोड यांच्या मते, ज्याला गाव शिवार नाही, जो कायम पोटासाठी गावोगाव भटकतो तो भटका.

अभ्यासकांच्या मते, नाव सांगायला स्वत:चे गाव नाही, रहायला घर नाही, जमिनीसारखे कायम स्वरूपाचे उत्पन्नाचे साधन नाही, उपेक्षित जगणे नशिबी आल्यामुळे पोट भरण्यासाठी कामाच्या निमित्ताने सतत गावोगाव भटकत असलेला आणि भिक्षेवर जगणारा अथवा परंपरेने चालत आलेल्या कलेच्या आधाराने स्वत:ची उपजीविका करणारा लोकसमूह, अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात वेगवेगळया जातीजमातींच्या नावाने जीवन जगताना आढळतो, अशा या लोकसमूहाला भटके असे म्हणतात.

भटक्या–विमुक्त म्हणून स्वातंत्र्योत्तर काळात संबोधित केलेल्या जमाती या देशातील आदिम जमाती व मूळ भूमिपुत्र आहेत. आर्यांच्या अमानुष हल्ल्यांमुळे त्यांना स्वत: निर्माण केलेले वैभव मनावर दगड ठेवून केवळ जीव वाचविण्यासाठी त्यागावे लागले व जंगलांचा आधार घ्यावा लागला. कालौघात वेगवेगळया कारणांमुळे भटक्या अवस्थेकडे ते वळले व भटकंती हेच त्यांच्या जीवनाचे तत्त्वज्ञान ठरले. या जमातीला कोणी त्यांचा गौरवाने भूमिपुत्र असा उल्लेख केला तर कोणी त्यांना अभिमानाने लोकसंस्कृतीचे उपासक असे म्हटले. भटकंती करणे हे इथल्या मनुवादी समाजव्यवस्थेने त्यांच्यावर जबरदस्तीने ती लादलेली आहे. भटक्यांना आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक सत्तेपासून दूर कसे ठेवता येईल याची सतत काळजी इथल्या व्यवस्थेने घेतलली दिसते. म्हणूनच आज या जाती–जमातीचे विकास झालेला दिसून येत नाही.

**महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती प्रवर्गनिहाय समावेश :–**

महाराष्ट्रात संपूर्ण वेगवेगळया जिल्हयामध्ये साधारणपणे भटक्या–विमुक्त जाती–जमातीचे लोक राहत असलेले दिसून येते. महाराष्ट्रात भटक्या–विमुक्तांच्या ४२ जाती–जमाती आढळतात. त्यातील १४ विमुक्त व २८ भटक्या आहेत. पुढे त्यात धनगर व बंजारी या जातींचाही समावेश करण्यात आले. आरक्षण धोरणानुसार या जातीचा समावेश वेगवेगळया वर्गात समावेश केला गेलेला आहे ते पुढीलप्रमाणे पाहता येईल.

**विमुक्त जाती–अ, आरक्षण ३ टक्के–**

विमुक्त जाती अ या प्रवर्गात एकूण प्रमुख १४ जातींचा समावेश झालेला आहे. त्यामध्ये कैकाडी, राज पारधी, रामोशी, वडार, बेरड, बेस्तर, भामटा, कंजारभाट, छप्परबंद, वाघरी, बंजारा, कटाबू, राजपूत भामटा या सर्व जातींना विमुक्त जाती दर्जा महाराष्ट्रात मिळालेला आहे. तसेच या १४ जातींना ३ टक्के आरक्षण देण्यात आलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

**भटक्या जमाती–ब, आरक्षण २.५ टक्के–**

भटक्या जमाती ब या प्रवर्गात समाविष्ट असलेल्या जमाती– बेलदार, भराडी, गोसावी, जोशी, गोल्ला, हेळवे, गोंधळी, गोपाळ, लोहार, भुते, गारूडी, चित्रकथी, रावळ, नंदीवाले, शिकलगार, पांगुळ, मसनजोगी, मैराळ, कोल्हाटी, काशी कापडी, भोई, वासुदेव, वैदू, वगळले, ओतारी, ठेलारी, मरीआईवाले, कडकलक्ष्मीवाले, मरगम्मावाले, गिहरा, गोसाई, मुस्लिम मदारी, गारूडी, सापवाले व जादूरण, भारतीय इराणी, गवळी इत्यांदी या सर्व जातीचा भटक्या जमाती–ब मध्ये समावेश होत असलेला दिसून येतो.

**भटक्या जमाती–क, आरक्षण ३.५ टक्के–**

भटक्या जमाती क या प्रवर्गात प्रामुख्याने धनगर या जमातीचाच समावेश होतो. या जमातीत वेगवेगळया उपजाती असून या सर्व उपजाती धनगर या प्रमुख जाती मध्ये समावेश झालेला आहे.

**भटक्या जमाती–ड, आरक्षण २ टक्के–**

भटक्या जमाती ड या प्रवर्गात प्रामुख्याने वंजारी या जमातीचा समावेश होतो. या जमातीत उपजाती म्हणून वंजार आणि वंजारा यांचा समावेश झालेला आहे.

महाराष्ट्रात वेगवेगळया आरक्षण धोरणातील बदलानुसार आज या चारही प्रवर्गातील जाती–जमातीला आरक्षण देण्यात आलेले आहे. परंतु या आरक्षणाच्या आधारे किंवा विशेष सुविधा दिल्यांनतर या जाती–जमातीचा विकास झालेला आहे का ? असे प्रश्न उपस्थित झाल्यास आपणास स्पष्टपणे सांगता येईल की, आज ही मोठया प्रमाणात या जाती–जमाती विकासापासून वंचित असलेल्या दिसून येते. या जमातीतील महिला आणखी पुर्णत: असुरक्षितच असल्याचे दिसून येते. महिलांना त्या–त्या समाजात बंदिस्त जीवन जगावे लागते आणि बाहेरील विश्वात देखील त्यांना वेगवेगळया ठिकाणी शोषणाला बळी पडावे लागते. कारण की, नेतृत्व करण्याची, लढण्याची, तसेच समाजाची असलेली भिती फार मोठया प्रमाणात असल्यामुळे महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. म्हणून या जाती–जमातीतील महिलांसाठी व सर्व पुरुष वर्गासाठी आणि इतर मागासवर्गीयासाठी विकासात्मक कार्य होणे गरजेचे आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत जातीविषयक विषमता फार पूर्वीपासून चालत आलेली आहे. त्यामध्ये भटके विमुक्तांना बदस्थानी येण्याची संधी प्राप्त करु दिली नाही, तसेच तशी संधी देखील देण्यात आलेली नाही. जातीसंस्थेने अनेक जनसमुहास उत्पन्नाचे, पोट भरण्याचे साधन नाकारल्याने काही समूह पोटाची खळगी भरण्यासाठी भटकू लागली. उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने हे जनसमूह भीक मागू लागले. भटकेपणाची दोन ढोबळ कारणे सांगता येतील. १. आर्थिक असुरक्षितता, २. स्थिर कायम उत्पन्नाची साधने नसणे.

मानवी जीवनातील सर्वच गोष्टी अर्थकारणाच्या आयामाभोवती फिरत असतात. अर्थकारणाच्या हितसंबंधाभोवती राजकारण फिरत असते. अर्थकारणाच्या हितसंबंधाभोवती राजकारण फिरत असते. अर्थकारणाच्या राजकीय हितसंबंधातून उच्च जातवर्गनि कनिष्ठ जातवर्ग निर्माण केला. म्हणून तर भारतातील सर्व राज्यात विविध जाती–जमाती निर्माण झाल्या आहेत. उच्च जात–वर्गनि स्वत:च्या हितसंबंधापोटीच या जाती बंदिस्त ठेवल्या हा उच्च जातवर्गाची निती खालच्या जातींना व भटक्यांना ओळखता आला नाही. म्हणून तर ही जातीसंस्था तोडण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या चळवळींना, प्रबोधकारी संस्थांना उच्चवर्गीय लोकांनी नेहमीच विरोध केला आहे.

महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त जाती–जमातींचा सध्यस्थितीचा आढावा घेतल्यास असे निदर्शनास येते की, साधारणपणे चार ते पाच वर्षात या समुदायाला नोकरी क्षेत्रातील संधी मिळू न देण्याचे प्रयत्न शासन आणि सरकार करीत असलेला दिसून येते. कारण की, आरक्षण धोरणातील बदल हे भटक्या विमुक्तांचे शोषणाचे कुटील कारस्थान असल्याचे दिसते. संपूर्ण देशात शिक्षण क्षेत्रातील नोकरीच्या बाबतीत असे दिसून येते की, खुल्या प्रवर्गासाठी सर्वात जास्त जागा रिक्त असलेल्या निदर्शनास आलेल्या आहेत. परंतु या मध्ये विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांच्या रिक्त जागेचा उल्लेख कुठेच दिसून येत नाही. म्हणजेच जाती आधारित समाज रचनेची पुन्हा सुरुवात झालेली आहे, असेच म्हणावे लागेल. या प्रक्रियेत सर्वांना लक्षात आले आहे की, लोकशाहीचे विपर्यास होत असून प्रभुत्वशाली गटाचे हे कुटील कारस्थान आहे. असे असताना देखील विमुक्त जाती–भटक्या जमाती मधील जन समुदाय स्वत: मध्ये परिवर्तन व विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. राजकीय क्षेत्रात पाहिजे त्या प्रमाणात संधी दिली जात नाही तसेच दिशाभूल करुन या समाजावर आपले वर्चस्व आबाधित राखण्यासाठी उच्चभ्रु वर्गातील लोक सतत प्रयत्न करीत असतात. म्हणून या समाजात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक तसेच इतर बाबतीत जाणीव निर्माण होणे गरजेचे आहे. तेव्हा या समाजात बदल झालेला दिसून येईल.

**महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय व त्यांची सध्यस्थिती:–**

इतर मागास वर्ग किंवा ओबीसी हा सामाजिकदृष्टया व शैक्षणिकदृष्टया मागासलेला प्रवर्ग आहे. भारतात बहुसंख्य समाज हा मागासलेला असून पुढारलेला समाज अल्पसंख्य आहे. या बहुसंख्य मागास समाजापैकी जो जास्त मागास आहे तो मुख्य मागास समजला जातो. त्याला अनुसूचित जाती–जमाती म्हटले जाते. या मुख्य मागासापेक्षा कमी मागासलेल्या समाजघटकांना इतर मागास ठरविण्यात आलेले आहे. भारतातील ४१ टक्के ते ५२ टक्के लोकसंख्या ओबीसी आहे. महाराष्ट्रात देखील इतर मागास वर्गाची संख्या मोठया प्रमाणात आहे. मंडल आयोगाने भारतातील ओबीसी जातींची संख्या ३७४३ इतकी नोंद केलेली आहे. तर महाराष्ट्रातील ओबीसी जातींची संख्या ३६० इतकी

नोंदली होती, मात्र सध्या ही संख्या ३४६ इतकी आहे. महाराष्ट्रात मागासवर्गीयांना १९ टक्के आरक्षण दिलेला आहे. तर देशात २७ टक्के आरक्षण दिलेला आहे. समकालीन परिस्थितीत ओबीसी जातींच्या आरक्षणाला देखील केंद्राच्या पातळीवर आव्हाने निर्माण झाली आहेत. आयोगाच्या माध्यमातून या समाजाचे दोन गटात वर्गवारी करण्याचे प्रयत्न चालू आहे. परंतु या मध्ये सर्वांना न्याय मिळेलच असे सांगता येत नाही. कारण की, शासनाच्या पातळीवर अतिमागास असलेल्या जातींचे निरीक्षण करुन विशेष सोयी–सुविधा उपलब्ध करुन दिल्यास त्या जातीं मध्ये परिवर्तन व विकास झालेला दिसून येईल.

महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीयांच्या विकासाकरिता शासन आणि सरकारच्या माध्यमातून वेगवेगळे प्रयत्न केले जात आहे. महाराष्ट्रमध्ये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांची निर्मिती करुन वेगवेगळ्या सोयी–सुविधा पुरविण्याचे कार्य या माध्यमातून केले जाते. परंतु खऱ्या अर्थाने या सुविधा सर्वांना मिळतात का ? लाभार्थींना पुर्णपणे फायदा झाला आहे का ? त्यांच्या दैनंदिन जीवन पध्दतीत यामुळे काही बदल झाला आहे का ? या सर्वांची पाहणी केल्यास असे निदर्शनास येतील की, कोणत्याही योजनेत भ्रष्टाचार हा फार मोठया प्रमाणात होत असलेला दिसून येते. तेव्हा खरंच या लोंकाना ती योजना पुर्णपणे मिळाली का ? असे प्रश्न उपस्थित होतांना दिसून येते. आज इतर मागासवर्गीय जातींतील लोकांचे देखील आर्थिक विवंचनेतून अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. जोपर्यंत त्यांच्या मुळच्या समस्यांचे निर्मूलन होत नाही तोपर्यंत या समाजातील जातींमध्ये परिवर्तन होणार नाही. म्हणून जातीविषयक विषमतेचे निर्मूलन होणे गरजेचे आहे. सर्वांना एका प्रवाहात आणण्यासाठी उच्चभ्रु जाती समुदायांनी तसे प्रयत्न करणे गरजेचे आहे. तेव्हा ओबीसी वर्गातील जातींचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु आज ओबीसी वर्गातील लोकांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहेत. वेगवेगळया समस्यांना सतत झगडावे लागत आहेत. जर इतर मागासवर्गीयातील जातींना मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर त्यांना समाजाच्या केंद्रस्थानी आणून त्या समाजात परिवर्तन घडवून आणणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :–**

महाराष्ट्रातील भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची सद्यस्थितीचे समस्या लक्षात घेतल्यानंतर असे म्हणता येते की, वेगवेगळया समस्यांना या जाती–जमातींच्या महिला व पुरुषांना दैनंदिन जीवनामध्ये तोंड घावे लागत असते. पारंपारिक ते आधुनिक समाजात देखील जातीसंस्थेच्या माध्यमातून शोषण होत असलेला दिसून येतो. समकालीन परिस्थितीत तर अन्याय, अत्याचार, तसेच जातीय दंगले घडवून आपआपसात द्वेष निर्माण करुन सत्तेपासून वंचित ठेवण्याचे प्रयत्न प्रभुत्वशाली जाती गट करीत असलेले दिसून येते. सध्यकालीन परिस्थितीत राजकीय समीकरण बदलेले आहे. लोकशाही व्यवस्थेला बाजूला करुन मूठभर लोकांच्या हातात सत्ता केंद्र असल्यामुळे दमनकारी व्यवस्था महाराष्ट्र आणि भारतात देखील अस्तित्वात असलेले दिसून येते. या विषमतावादी समाजव्यवस्थेला छेद देण्यासाठी कार्ल मार्क्सला अभिप्रेत असलेला संघर्ष होणे गरजेचे आहे. तेव्हा मात्र समतावादी, समाजवादी, साम्यवादी समाज अस्तित्वात येवू शकेल. त्यासाठी अन्यायग्रस्त जनसमुदायांनी एकत्र येवून परिवर्तनाचा लढा उभारणे गरजेचे आहे. त्या संघर्षातून परिवर्तनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरणा मिळू शकते. तेव्हा मात्र आपणास या भटक्या–विमुक्त जाती–जमाती व इतर मागासवर्गीयांची प्रगती झालेली दिसून येईल.

**संदर्भग्रंथ :–**


१. चव्हाण रामनाथ, (१९८९), भटक्या विमुक्तांचे अंतरंग, सुगावा प्रकाशन, पुणे.

२. भोसले नारायण, (२००८), भटक्यांची पितृसत्ताक जातपंचायत : परंपरा आणि संघर्ष, द ताईची प्रकाशन, पुणे.

३. जाधव रमेश, (२०१३), भटक्या–विमुक्तांचे परिप्रेक्ष्य, हरणाई प्रकाशन, नांदेड.

४. राठोड गणपत, (२०१५), घुमन्तू जनजातियों का सांस्कृतिक अध्ययन, पूजा पब्लिकेशन, कानपूर.

५. कांबळे उत्तम, (२०१३), भटक्यांचे लग्न, मनोविकास प्रकाशन, पुणे.

६. राठोड अमर, (२००८), आरक्षण : विमुक्त भटक्यांचे, साप्ताहिक बंजारा पुकार, नांदेड.

७. पवार अशोक, (२०१३), भारतीय भटक्यांचा विमुक्तनामा : रेणके आयोग, वस्तूस्थिती व विपर्यास, लोकपाल पब्लिकेशन, औरंगाबाद.

८. राठोड मोतीराज, (२०१५), नोटीफाइड ट्राइब्स, नोमॅडिक ट्राइब्स, निर्माण संस्था, पुणे.

९. पवार अशोक, (२०१३), भटका समाज : लोकसंख्या आणि दारिद्र्य, लोकपाल पब्लिकेशन, औरंगाबाद.


❑❑❑



Scanned with OKEN Scanner